विशेष मागास प्रवर्गाकरिता शासकीय/
निमशासकीय सेवेत आरक्षण.

---

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्रमांक:-बीसीसी-1094/प्र.क्र.68/94/16-ब,
मंत्रालय, मुंबई-400 032. दिनांक:24 जुलै, 1998.

पहा:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:-बीसीसी-1094/प्र.क्र.68/94/16-ब,
दिनांक 15 जून,1995.

शुध्दीपत्रक

उपरोक्त विषयीचा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:-बीसीसी 1094/प्र.क्र.68/94/16-ब, दिनांक 15 जून,1995 मधील परिच्छेद क्र.4 ऐवजी खालीलप्रमाणे सुधारित परिच्छेद क्र.4 वाचावा :-

4. वर उल्लेखिलेल्या "विशेष मागास प्रवर्गास देण्यात आलेले आरक्षण हे सरळसेवा भरतीसाठी, व पदोन्नतीसाठी अनुज्ञेय राहील. तसेच या प्रवर्गाला क्रिमीलेअरचे तत्व लागू राहणार नाही. या प्रवर्गातील ज्या व्यक्तींनी या आधीच अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय, निमशासकीय, तसेच मंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, सहकारी बँका, शासकीय उपक्रम व शैक्षणिक संस्था इत्यादींच्या सेवेत प्रवेश मिळविलेला असेल, त्यांना सेवेतून काढून टाकण्यात येऊ नये. तसेच प्रवेश मिळविल्यानंतर याआधीच पदोन्नती प्राप्त केलेली असेल त्यांना पदावनत करु नये."

2. हे आदेश (शुध्दीपत्रक) मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांच्या व कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नवीन कुमार,
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव/उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
सचिव, राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सहायक आयुक्त, (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2 (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2, (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

* पत्राने.

एच-696(5000-8-98)